# ग्रामीण समुदायातील महिलांचे शिक्षण
## (Women's Education in Rural Community)

**डॉ. रामनाथ पवार**
समाजशास्त्र विभाग,
मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृतीला जवळपास ५ हजार वर्षाचा इतिहास आहे, प्राचीन काळात भारतीय समाजात महिलांचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते. परंतु आर्यांच्या आगमनानंतर हळूहळू महिलांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत निम्न होत गेले. पुरुष प्रधान कुटुंबसंस्थेच्या प्रभावामुळे स्त्रियांचे कुटुंबातील व समाजातील स्थान निम्न होत असतानाच त्यांच्यावर अनेक बंधनेही लादली गेली. त्याचा परिणाम महिलांच्या शिक्षण व पर्यायाने विकासावर झालेला स्पष्टपणे दिसून येतो. ब्रिटीश कालखंडात समाजसुधारणेच्या चळवळी उदयास आल्या व इतर सुधारणांबरोबरच स्त्रियांच्या सुधारणेकडेही या चळवळीच्या माध्यमातुन लक्ष वेधले गेले. परिणामी स्त्रियांच्या संदर्भातील विविध अन्यायकारक रुढी - परंपरा संपुष्टात येण्याबरोबरच स्त्रियांच्या शिक्षणाची दारे खूली झाली.

म. फुले म्हणतात, "जर एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती शिक्षित होईल, पण एक स्त्रीला शिक्षण दिले तर एक कुटुंब शिक्षित होईल." म्हणुनच लोकशाही विचार प्रणाली स्विकारलेल्या आपल्या देशात स्त्री-शिक्षणाचे विशेष महत्व आहे. लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला सारखाच अधिकार असतो. या अधिकाराचा योग्य वापर व्हावयाचा असेल तर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीही शिकली पाहिजे, शिक्षणामुळेच स्त्रीचे जीवन बदलु शकते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. भारतीय स्त्रियांच्या विविध कालखंडातील स्थितीचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या शिक्षणाचा आढावा घेणे.
३. पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या शिक्षणाबाबतचा सामाजिक दृष्टीकोन अभ्यासणे.
४. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
५. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या शिक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध-निबंध तयार करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, शासकीय अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा उपयोग केला आहे.

**ग्रामीण भागातील स्त्री-शिक्षणाची आवश्यकता :**

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने देशातील जवळपास ७५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विकासाची देशाला खरी गरज आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत ५० टक्के स्त्रिया आहेत. या स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. ही देशाची अर्धी लोकसंख्या म्हणजेच स्त्रिया अशिक्षित, अडाणी राहिल्या तर देशाचा विकास होणार नाही असे मत पं. नेहरुंनी व्यक्त केले होते.

राष्ट्राचा दर्जा उंचावयाचा असेल तर स्त्रीचा दर्जा समाजामध्ये उंचावला गेला पाहिजे. गावांचा व देशाचा विकास घडवून आणण्यासाठी विविध विकास योजनांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविला पाहिजे. जमीन, पाणी, घर इत्यादी साधनांवरील स्त्रीच्या मालकी हक्काची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. विकासाच्या नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे. बालविवाह, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार आदी बाबत स्थानिक पातळीवर प्रबोधन व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम तयार करुन त्यात स्त्रियांचा सहभाग वाढवून निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करुन घेतले पाहिजे, तरच राष्ट्राचा विकास शक्य होईल. या सर्व प्रक्रियेत निर्णय घेण्याची भूमिका स्त्री तेंव्हाच पार पाडू शकते जेंव्हा तिच्यातील अंगभूत गुणांचा विकास होईल, तिच्यामध्ये विचार करण्याची शक्ती येईल. चांगले-वाईट तिला समजू शकेल, हे सर्व होण्यासाठी ग्रामीण स्त्रीला परंपरागत अज्ञानाच्या अंधकारमय जीवनातून बाहेर काढावे लागेल व तिला शिक्षण द्यावे लागेल. ग्रामीण स्त्री शिकली तरच ती विचार करु शकेल व ग्रामीण समाजाच्या प्रगतीला हातभार लावू शकेल.

स्त्रीची भूमिका माता व पत्नी एवढ्या पुरतीच मर्यादित राहिली नाही तर बदलत्या समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व तिच्या स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास घडवुन आणण्यासाठी स्त्री-शिक्षणाची आवश्यकता आहे. कुटुंब, समाज व पर्यायाने राष्ट्राच्या विकासाच्या स्त्रिया शिल्पकार आहेत, त्यामुळे वेगवेगळे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्त्री-शिक्षणाची आवश्यकता आहे.

**अ) सुसंस्कारासाठी स्त्री-शिक्षण :**

स्त्री ही दिर्घकाळ मातेची भूमिका पार पाडत असते, सामाजीकरणाच्या माध्यमातून आपल्या मुलांना सुसंस्कारीत करण्याची महत्वाची जबाबदारी स्त्रीची असते. त्याचे व्यक्तीमत्व, चारित्र्य व भविष्य घडविण्याची महत्वपूर्ण भूमिका स्त्री पार पाडत असते, ही भूमिका योग्य रितीने पार पाडण्यासाठी स्त्री-शिक्षणाची आवश्यकता आहे.

**ब) समाज परिवर्तनासाठी स्त्री-शिक्षण :**

अलीकडील काळात शहरी समुदायात सामाजिक परिवर्तन वेगाने होत आहे. परंतु त्या तुलनेत ग्रामीण समाज अजूनही परंपरागत विचारसरणी व साधनांच्या चक्रव्यूहामध्ये अडकलेला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या मार्गात स्त्रियांची संकुचित वैचारिकता हा महत्वाचा अडसर ठरत आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' म्हणून स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्यांची गुलामगिरीच्या मानसिकतेतून सुटका होईल. तसेच अन्याय, अत्याचार इत्यादी बाबी संबंधी त्यांना माहिती मिळेल व त्या विचार करु लागतील. त्याचप्रमाणे समाजातील कालबाह्य अनिष्ट प्रथा, रुढी यांच्यापासूनही त्यांची मुक्तता होईल व त्यांचे वर्तन अधिक मोकळे, अधिक आत्मविश्वासपूर्ण होऊन समाज परिवर्तनाला त्यांचा हातभार लागेल व समाज परिवर्तनातील अडथळे दूर होतील.

**क) समानतेसाठी स्त्री-शिक्षण :**

मुला-मुलींचे शिक्षण समान व्हावे, दोघांवरही समान संस्कार केले जावेत. स्त्रियाही माणूस आहेत, माणसासारखे जगण्याची संधी त्यांना मिळायला हवी. स्त्रियांना शिक्षणाची वाट खुली केली पाहिजे असा विचार करुन कृती करणारे महात्मा फुले हे पहिलेच विचारवंत आहेत. या घटनेला दिडशे वर्ष होऊन गेली, परंतू अजूनही स्त्री-शिक्षणाचा पाहिजे तेवढा प्रचार विशेषतः ग्रामीण भागात झालेला नाही, स्त्री-पुरुष विषमता आजही दिसून येते.

स्त्रीचे मुख्य काम घरकाम आहे, घरकाम दुय्यम म्हणून तिचेही स्थान दुय्यम मानले जाते. स्त्रीला समानता देण्याचा मुख्यमार्ग म्हणजे कामातील हा भेद नाहिसा करणे, म्हणजेच घरातील स्वयंपाक, स्वच्छता बालसंगोपन ही कामे स्त्री व पुरुष दोघांनीही केल्यास स्त्रीचा दर्जा समान होण्यास मदत होईल.

**ड) आत्मनिर्भरतेसाठी स्त्री-शिक्षण :**

ग्रामीण स्त्री ही परंपरेने बांधली गेलेली आहे, म्हणून ती परावलंबी आहे, स्वतंत्र निर्णय घेणे, एखादे काम स्वतःच्या मताने करणे, या सर्व बाबतीत ती मागे पडते. प्रत्येक ठिकाणी तिला पुरुषाचा आधार लागतो. तसेच सासरी गेलेली स्त्री माहेराला मुकली असेही समजले जाते, त्यामुळे तिचे परावलंबीत्व अधिकच वाढते. स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळविण्यासाठी आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे व ही आत्मनिर्भरता आर्थिक स्वातंत्र्याने मिळेल आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तिला अगोदर शिकावे लागेल.

**इ) आरोग्यासाठी स्त्री-शिक्षण :**

आजच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत मानवी जीवनमान व राहणीमान यांच्यात झपाट्याने बदल होत आहे. विशेषतः ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या राहणीमानाचा दर्जा दिवसेंदिवस खालावत आहे. कुपोषणामुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे, बाळंतपणात मृत्युमूखी पडणाऱ्या स्त्रिया व अर्भके यांचे कारणही कुपोषण हेच आहे. नवजात अर्भकांच्या मृत्यूचे मुख्य कारण मातेचे अनारोग्य हेच असते. त्यांची अत्यंत खालावलेली पोषणाची पातळी व आरोग्याची न घेतलेली काळजी यामुळे अशक्त मुले जन्माला येतात व त्यातील काही मुले जगावीत म्हणून वारंवार बाळंतपणे ओढवून घेतली जातात. दोन बाळंतपणामधील कमी अंतर हे ही त्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरते. पौष्टिक आहार, गर्भधारणा, बाळंतपण या गोष्टींची शास्त्रीय माहिती ग्रामीण स्त्रियांना शिक्षणाच्या माध्यमातून मिळाली तर आरोग्यासंबंधीचा मोठा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**भारतातील स्त्री-शिक्षणाचा विकास :**

भारताची ओळख जगाला वेदांमुळेच झाली, वेद हे सर्वात प्राचीन मानले जातात. प्राचीन काळात स्त्रिया अध्ययनाबरोबरच अध्यापनाचेही काम करत असत. समाजात त्यांचा 'उपाध्याया' या नावाने उल्लेख केला जात असे. कामंदकी या बौद्ध भिक्षूणीकडे कित्येक ठिकाणाहून शेकडो विद्यार्थी अध्ययनासाठी येत असल्याचा उल्लेख आढळतो.

वैदिक काळात सुरु झालेली स्त्री शिक्षणाची परंपरा त्यानंतरच्या काळातही दिसून येते. रामायणात सिता रोज संध्या करत असे. कौसल्या माताही मंत्रपठनादी सोबतच वैदिक यज्ञ करत असल्याचा उल्लेख आला आहे. कालांतराने मुलींच्या विवाहाचे वय कमी झाल्याने वेदाध्यायनाच्या बाबतीत त्या मागे पडल्या. त्यातच पौराणिक व्रत-वैकल्याचे प्रस्थ वाढले व स्त्रियांवरील बंधनातही वाढ होत गेली. इ.स. १२०० च्या सुमारास उत्तर भारतात मुसलमानी अंमल वाढत गेला व पडदा पद्धती रुढ होऊ लागली आणि घर हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र बनले.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत होऊन इंग्रजाची राजवट सुरु झाली, इंग्रजानी भारतात शिक्षणासंबंधी प्रयत्न सुरु केले. इ.स. १८२४ मध्ये अमेरीकन मिशनऱ्यांनी मुंबईत एतद्देशीय मुलींकरिता खास स्वतंत्र शाळा स्थापन केली. १८३० च्या सुमारास भारतभर खास मुलींच्या अशा जवळपास ३० शाळा स्थापन होऊन त्यातून ५०० पेक्षा जास्त मुली शिक्षण घेत होत्या.

२१ ऑगस्ट १८४९ रोजी 'दि स्टुडंटस लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' च्या वतीने मराठी हिंदू मुलींसाठी ०३ शाळा सुरु करण्यात आल्या होत्या, त्यातून २४ हिंदू, ०४ पारशी व इतर ४४ मुली शिक्षण घेत होत्या.

जगन्नाथ शंकरशेठ, भाऊदाजी मंगलदास, भगवान पुरुषोत्तम दास, दादाभाई नौरोजी यांचा स्त्री-शिक्षणास पूर्ण पाठिंबा होता. इ.स. १८७१ च्या सुमारास मेरी कारपेंटर यांनी मुंबई व पुणे येथील स्त्री-शिक्षणास विशेष उत्तेजन दिले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी खास वेगळा अभ्यासक्रम आखण्यात आला. इ.स. १९१६ मध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-शिक्षणासाठी महिला विद्यापीठाची स्थापना केली. इ.स. १८४८ मध्ये महात्मा फुले यांनी पूणे येथे मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला व राज्यघटनेने स्त्री-पुरुष दोघांनाही समानतेचा अधिकार दिला. इ.स. १९४७ मध्ये विविध शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलींची एकूण संख्या ४१ लाख होती. ही संख्या १९६०-६१ मध्ये १ कोटी ३८ लाख ५८ हजार एवढी झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १३ वर्षात सर्व स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या संख्येत ९७ लाख ५८ हजार इतकी वाढ झाली.

इ.स. १९२१ मध्ये स्त्री-साक्षरतेचा दर १.८१ टक्के होता. इ.स. १९५१ मध्ये स्त्री-साक्षरतेचा दर ९.४५ टक्के होता. इ.स. १९८१ मध्ये तो २४.८२ टक्के होता, तर इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार स्त्री-साक्षरतेचा दर ६५.४६ टक्के एवढा वाढला आहे. विविध शैक्षणिक आयोगानेही स्त्री-शिक्षणासाठी भरीव अशा शिफारशी केल्या आहेत. मागील काही वर्षात भारतातील स्त्री-शिक्षणाची प्रगती उल्लेखनीय झाली आहे असे म्हणता येईल.

प्राथमिक शिक्षणात 'सर्व शिक्षा अभियान' मोहिमेमुळे मुलींच्या शिक्षणाला चालना मिळाली. शासनाने मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी मुलींचा उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत गणवेश, मोफत पुस्तके, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन, शाळेला जाण्यासाठी मोफत सायकल योजना, एस.टी. मोफत पास योजना, कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय, मानव विकास मिशनच्या विविध योजना, लेक वाचवा लेक शिकवा या सारख्या अनेक योजनांच्या माध्यमातून विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शासन प्रयत्न करत आहे.

**निष्कर्ष :**

१. प्राचीन काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेता येत होते.
२. पारंपरिक समाजजीवनात स्त्री शिक्षणास बंदी होती.
३. ब्रिटीशांच्या मदतीने स्त्री-शिक्षणास पुन्हा चालना मिळाली.
४. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेने पुरुषांच्या बरोबरीचे स्थान स्त्रियांना दिले, त्यामुळे स्त्री-शिक्षणाचे प्रमाण लक्षणीय वाढले.
५. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील स्त्री-शिक्षणाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे.
६. अलिकडील काळात स्त्रिया शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत.

**समारोप :**

भारतीय समाजातील स्त्री-शिक्षणाचे प्रमाण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लक्षणीय वाढत आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही शिक्षणाच्या सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिल्यामुळे ग्रामीण भागातील मुलीही शिक्षण घेत आहेत. शिक्षणाने

सर्वांगिण विकास होतो, हे आता पालकांच्याही लक्षात आले आहे. म्हणुनच मुलींचे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. याचा परिणाम म्हणून महिलांची विविध क्षेत्रातील नेत्रदिपक झालेली प्रगती दिसुन येते. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, आय.ए.एस.,आय.पी.एस. अशा विविध उच्च पदावर महिला आज यशस्वीपणे काम करत आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**


१. नाडगोंडे गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. मंगला सामंत, स्त्री-पर्व, सुगावा प्रकाशन, पुणे.

३. डॉ. बाबर सरोजिनी, स्त्री शिक्षणाची वाटचाल, शासकीय मुद्रणालय, मुंबई.

४. पाटील लीला व कुलकर्णी विश्वंभर, आजचे शिक्षण आजच्या समस्या, विद्या प्रकाशन, पुणे.

५. महिला धोरण - २०१४, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६. https://censusindia.gov.in